असा. क्र. ५६

रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२०००

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शनिवार, ऑगस्ट १९, २०००/श्रावण २८, शके १९२२

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम

### अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८.––महाराष्ट्र राज्यात माहिती मिळण्याचा अधिकार तसेच तत्संबंधी व तदनुषंगिक बाबींची तरतूद करण्यासाठी अधिनियम | ३६७–३७२ |

दिनांक १६ ऑगस्ट २००० रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र राज्य विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**प्रतिमा उमरजी,**
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

### सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक १९ ऑगस्ट २००० रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र राज्यात माहिती मिळण्याचा अधिकार तसेच तत्संबंधी व तदनुषंगिक बाबींची तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी**, महाराष्ट्र राज्यात माहिती मिळण्याचा अधिकार तसेच तत्संबंधी व तदनुषंगिक बाबींची तरतूद करणे इष्ट आहे; **त्याअर्थी**, भारतीय गणराज्याच्या एक्कावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :––

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००० असे म्हणावे.

(२) तो, राज्य शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नेमून देईल अशा दिनांकास अंमलात येईल.

व्याख्या.

२. या अधिनियमात, संदर्भानुसार अन्य अर्थ अपेक्षित नसेल तर,---

(१) " सक्षम प्राधिकारी " याचा अर्थ, उप जिल्हाधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेला कोणताही प्राधिकारी, किंवा अधिकारी किंवा या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, शासनाने, अधिसूचनेद्वारे सक्षम प्राधिकारी म्हणून अधिकार प्रदान केलेला समतुल्य दर्जाचा किंवा त्याहून अधिक वरच्या दर्जाचा अधिकारी, असा आहे;

(२) " शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे;

(३) " माहिती " या शब्दप्रयोगामध्ये, राज्याच्या किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अधिनियमान्वये, रचना करण्यात आलेल्या कोणत्याही स्थानिक किंवा अन्य प्राधिकरणांच्या किंवा एखाद्या सांविधिक प्राधिकरणाच्या किंवा शासनाच्या मालकीचा किंवा शासनाचे नियंत्रण असणाऱ्या एखाद्या कंपनीच्या, महामंडळाच्या किंवा सहकारी संस्थेच्या किंवा कोणत्याही संघटनेच्या कामकाजाशी संबंधित कोणत्याही दस्तऐवजाची प्रत, यांचा समावेश होतो.

माहिती मिळण्याचा अधिकार.

३. (१) प्रामाणिक हेतूने माहिती मागणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला या अधिनियमाखाली विनिर्दिष्ट केलेल्या कार्यवाहीस अनुसरून अशी माहिती मिळण्याचा अधिकार असेल.

(२) पोट-कलम (१) मध्ये, काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही व्यक्तीला,---

(क) सुरक्षा व्यवस्थेशी संबंधित माहिती;

(ख) जी उघड केल्याने राष्ट्राच्या सुरक्षेला, एकात्मतेला किंवा सार्वभौमत्वाला किंवा राज्याच्या सुरक्षेला बाधा पोहोचेल अशी माहिती;

(ग) जी उघड केल्याने परराष्ट्र संबंध किंवा व्यवहार यांच्यामध्ये बाध येईल अशी माहिती;

(घ) परकीय सरकारे, परकीय न्यायालये किंवा परकीय संस्था यांच्याकडून गोपनीय पद्धतीने मिळालेली माहिती;

(ङ) जी उघड केल्याने पुढील विषयांवरील देशांतर्गत चर्चांच्या प्रामाणिकपणास व खुलेपणास बाध येईल अशी माहिती,---

(एक) कॅबिनेट आणि कॅबिनेट समित्यांच्या कार्यवाहीशी संबंधित माहिती;

(दोन) अंतर्गत मत, सल्ला, शिफारशी, विचारविनिमय आणि बोलणी यांच्याशी संबंधित माहिती;

(तीन) अंतर्गत धोरणाच्या विश्लेषणांशी संबंधित भावी योजना आणि गृहीते, नाकारण्यात आलेल्या पर्यायी धोरणाशी संबंधित पर्यायी धोरणाचे व माहितीचे विश्लेषण या संबंधीची माहिती;

(चार) विभाग, सार्वजनिक मंडळे आणि विनियामक मंडळे यांच्यातील गोपनीय अंतर्गत, संपर्क यासंबंधीची माहिती;

(च) मंत्री आणि राज्यपाल यांच्यामधील गोपनीय स्वरूपाच्या संपर्काची माहिती ;

(छ) जी उघड केल्याने, निर्दोष न्यायचौकशी आणि कायद्याची अंमलबजावणी अथवा त्याचे योग्य रीतीने केलेले प्रशासन यांच्यासह, न्यायदानामध्ये बाध येईल अशी माहिती;

(ज) जी माहिती उघड केल्याने, विधिविषयक कार्यवाहीत किंवा कोणत्याही न्यायाधिकरणाच्या कार्यवाहीत किंवा सार्वजनिक चौकशीत किंवा अन्य कोणत्याही औपचारिक चौकशीत (प्रत्यक्षातील किंवा संभाव्य) बाध येईल अशी माहिती किंवा अशा कार्यवाहींच्या संदर्भात अशी माहिती उघड झाल्याचे नमूद झाले आहे किंवा करण्यात आले आहे किंवा केले जाण्याची शक्यता आहे अशी माहिती ;

(झ) विधि व्यवसायींच्या विशेषाधिकारामध्ये जिचा समावेश होतो अशी माहिती ;

(ञ) जी माहिती उघड केल्याने गुन्ह्यास प्रतिबंध, अन्वेषण किंवा तपास, गुन्हेगारांना पकडणे या कामांमध्ये बाध येईल अशी माहिती ;

(ट) जी उघड केल्याने सार्वजनिक सुरक्षितता किंवा सार्वजनिक सुव्यवस्था यांना हानी पोहोचेल अशी माहिती ;

(ठ) जी उघड केल्याने कोणत्याही व्यक्तीच्या जीवितास किंवा शारीरिक सुरक्षेस धोका निर्माण होईल, किंवा कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी किंवा सुरक्षा प्रयोजनांसाठी गोपनीय रीतीने दिलेल्या माहितीचा किंवा सहाय्याचा स्त्रोत ओळखता येईल अशी माहिती ;

(ड) जी उघड केल्याने पर्यावरणाची किंवा दुर्मिळ वा नष्ट होत चाललेल्या जीवसृष्टीला हानी पोहोचण्याची शक्यता वाढेल अशी माहिती ;

(ढ) जी उघड केल्याने अर्थव्यवस्थेचे व्यवस्थापन करण्याच्या शासनाच्या क्षमतेला हानी पोहोचेल, शासकीय पणन व्यवहाराला बाध उत्पन्न होईल किंवा कोणत्याही व्यक्तीला अनुचित लाभ किंवा फायदा मिळवून देईल अशी माहिती ;

(ण) जी उघड केल्याने कर, शुल्के यांचे निर्धारण करण्याच्या व ते गोळा करण्याच्या कामामध्ये बाध येईल किंवा कर टाळण्याला किंवा चुकविण्याला मदत होईल अशी माहिती;

(त) जी विनापरवानगी उघड केल्याने स्पर्धेतील तिसऱ्या पक्षाच्या स्थानाला हानी पोहोचेल अशी वाणिज्यिक गोपनीय माहिती, व्यावसायिक गुपिते किंवा बौद्धिक संपदा यांचा समावेश असलेली माहिती;

(थ) जी उघड केल्याने ती अनुचित लाभ किंवा फायदा मिळण्यास कारणीभूत ठरेल किंवा पुढील बाबींना बाध आणील अशी माहिती,—

(एक) एखाद्या विभागाचे किंवा अन्य सार्वजनिक मंडळाचे किंवा प्राधिकरणाचे स्पर्धेमधील स्थान;

(दोन) कर्मचारीवर्गाचे व्यवस्थापन किंवा वाणिज्यिक किंवा कंत्राटी कामे याबाबतच्या वाटाघाटी किंवा त्यांचे प्रभावी आयोजन ;

(द) एखाद्या व्यक्तीने,—

(एक) ज्या माहितीची गोपनीयता सुरक्षित ठेवली जाईल अशी सांविधिक हमी दिलेली असतानाही ती माहिती दिली असेल ; किंवा

(दोन) ती पुरवण्याबाबत कोणत्याही प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष विधिविषयक बंधनाखाली नसताना ती पुरवली असेल आणि ती उघड करण्याबाबत तिने संमती दिलेली नसेल ;

अशा गोपनीय रीतीने दिलेल्या माहितीच्या परिणामस्वरूप प्राप्त झालेली माहिती ;

(ध) कोणत्याही अधिनियमाखाली, विनियमाखाली किंवा आंतरराष्ट्रीय कराराखाली जी उघड करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे अशी माहिती ;

(न) जी उघड केल्याने संसदेच्या, विधानसभेच्या किंवा विधानपरिषदेच्या विशेषाधिकाराचा भंग होईल अशी माहिती ;

(प) भारतीय पुरावा अधिनियम, १८७२ च्या कलमे १२३ व १२४ मध्ये निर्देशित केलेले दस्तऐवज ; १८७२ चा १.

(फ) (एक) ज्यामुळे गुन्हा घडण्यास मदत होऊ शकेल ;

(दोन) ज्यामुळे कायदेशीर ताब्यामधून गुन्हेगाराला निसटण्यास मदत होऊ शकेल किंवा ते सुकर होईल किंवा ज्यामुळे कारागृहाच्या सुरक्षिततेवर परिणाम होईल ; किंवा

(तीन) ज्यामुळे गुन्हेगारांचा तपास करणे किंवा त्यांची ओळख पटवणे किंवा त्यांच्यावर खटला दाखल करणे या प्रक्रियांमध्ये अडथळा येईल,—

अशी कोणतीही गोष्ट ;

यासंबंधीची माहिती दिली जाणार नाही.

माहिती मिळण्याची प्रक्रिया.

४. (१) जिला माहिती मिळवावयाची असेल अशा कोणत्याही व्यक्तीला विहित केलेल्या पद्धतीने संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे अर्ज करता येईल ;

(२) पोट-कलम (१) अन्वये अर्ज करण्यात आला असेल आणि ती माहिती सक्षम प्राधिकाऱ्याकडे उपलब्ध नसेल परंतु दुसऱ्या विभागात किंवा प्राधिकाऱ्याकडे ती उपलब्ध असेल अशा परिस्थितीत सक्षम प्राधिकारी तो अर्ज ज्याच्याकडे ती माहिती उपलब्ध असेल अशा विभागाकडे किंवा प्राधिकाऱ्याकडे हस्तांतरित करील व त्यानुसार अर्जदाराला कळवील. असा अर्ज ज्याच्याकडे हस्तांतरित करण्यात आला असेल असे विभाग किंवा प्राधिकारी ती माहिती सक्षम प्राधिकाऱ्याकडून ती प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून तीस कामाच्या दिवसांच्या आत अर्जदाराला पुरवील.

(३) पोट-कलम (२) अन्वये सक्षम प्राधिकाऱ्याकडून असा अर्ज जेव्हा एखाद्या विभागाकडे किंवा प्राधिकाऱ्याकडे हस्तांतरित केला जाईल तेव्हा त्या विभागाचा विभाग प्रमुख किंवा संबंधित प्राधिकारी हा सक्षम प्राधिकारी असल्याचे मानण्यात येईल.

(४) माहिती देण्याची विनंती करणारा अर्ज प्राप्त झाल्यावर, सक्षम प्राधिकारी त्यावर विचार करील आणि पुढीलप्रमाणे कार्यवाही करील —

(एक) मागितलेली माहिती सक्षम प्राधिकाऱ्याच्या ताब्यात असेल आणि अशी माहिती कलम ३ च्या पोट-कलम (२) मध्ये निर्देशिलेल्या बाबींच्या कोणत्याही एका किंवा अधिक प्रवर्गांमध्ये मोडत नसेल तर, तो अशी माहिती, शक्यतोवर, अर्ज प्राप्त झाल्यापासून तीस कामाच्या दिवसांच्या कालावधीत अर्जदारास पुरवील.

(दोन) मागितलेली माहिती सक्षम प्राधिकाऱ्याच्या ताब्यात असेल, परंतु अशी माहिती कलम ३ च्या पोट-कलम (२) मध्ये निर्देशिलेल्या बाबींच्या कोणत्याही एका किंवा अधिक प्रवर्गामध्ये मोडत असेल तर, तो अशी मागणी फेटाळील आणि अर्जदारास मागणी फेटाळल्याची कारणे कळवील.

(तीन) जर सक्षम प्राधिकारी, प्रस्तुत विषय हाताळीत असेल परंतु, बराच आर्थिक खर्च केल्याशिवाय किंवा बरेच काम केल्याशिवाय अशी माहिती संकलीत करणे शक्य नसेल तर, लेखी कारणे नमूद करून, तदनुसार, अर्जदारास, दिलगिरीचे उत्तर पाठवील. तथापि, सक्षम प्राधिकारी त्वरित उपलब्ध होणारी कोणतीही संबंधित माहिती पुरवू शकेल.

अपील.

५. (१) एखादी व्यक्ती, —

(क) तिने कलम ४ च्या पोट-कलम (१) अन्वये सक्षम प्राधिकाऱ्याकडे केलेल्या अर्जावर, तिने अर्ज केलेल्या दिनांकापासून तीस कामाच्या दिवसांपर्यंत, कोणतेही उत्तर प्राप्त झाले नाही तर, शासनाकडे किंवा शासनाने त्याच्या वतीने अधिसूचित केलेल्या अशा अन्य प्राधिकाऱ्याकडे लेखी तक्रार करू शकेल ;

(ख) कलम ४ च्या पोट-कलम (४) अन्वये सक्षम प्राधिकाऱ्याने काढलेल्या फेटाळणी आदेशाने किंवा फेटाळणी उत्तराने पीडित झाली असेल तर, शासनाकडे किंवा शासनाने त्याच्या वतीने अधिसूचित केलेल्या अशा अन्य प्राधिकाऱ्याकडे अपील करू शकेल.

(२) शासनाचा किंवा पोट-कलम (१) अन्वये अधिसूचित केलेल्या अशा अन्य प्राधिकरणाचा निर्णय अंतिम असेल.

फीची आकारणी.

६. सक्षम प्राधिकारी, माहिती पुरविण्याकरिता विहित केली असेल त्यानुसार फी आकारील, परंतु ही फी, अशा माहितीच्या प्रक्रियेसाठी व ती उपलब्ध करून देण्यासाठी आलेल्या खर्चापेक्षा अधिक असणार नाही.

सद्‌भावनेने केलेल्या कृतीला संरक्षण.

७. या अधिनियमानुसार किंवा त्याखाली केलेल्या नियमांनुसार सद्‌भावनेने केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टीसाठी कोणतेही प्राधिकरण किंवा व्यक्ती यांच्या विरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

८. या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना जर कोणतीही अडचण उद्‌भवली तर, शासन, प्रसंगी **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील अशा, अडचणी दूर करण्याकरिता त्यांना आवश्यक किंवा इष्ट वाटतील अशा, कोणत्याही गोष्टी करील :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा कोणताही आदेश देण्यात येणार नाही.

नियम करण्याचा अधिकार. ९. (१) शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील.

(२) या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा त्याहून अधिक अधिवेशनांत, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्यामध्ये अशा प्रकारे तो ठेवण्यात येईल ते अधिवेशन किंवा त्या अधिवेशनाच्या लगतनंतरचे अधिवेशन, समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य होईल तर व तशा अर्थाचा त्यांचा निर्णय ते **राजपत्रात** अधिसूचित करतील तर, त्यानंतर तो नियम अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल किंवा यथास्थिति, मुळीच अंमलात येणार नाही ; तथापि असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी करण्यात आलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टींच्या वैधतेस बाध येणार नाही.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई